<u>विशेष खटला क्र.०४/२०१६</u>
<u>शासन वि. अंकुश</u>
<u>निशाणी क्रमांक –७१</u>

<u>साक्षीदाराची साक्ष दुरसंवाद चित्रवाणीद्वारे नोंदविण्यात आली.</u>

<u>सरकार पक्षातर्फे पुढील सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री.बी.एच.खेडकर यांच्या मार्फतः–</u>

१९. आरोपीने लाचेची रक्कम त्याच्या उजव्या हाताने स्वीकारुन त्याच्या पँटच्या खिशामध्ये ठेवली होती. आरोपीने घातलेली ती पँट आम्ही त्याच्या कार्यालयातील इसमामार्फत पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर त्या पॅट जप्तीचा मी सविस्तर पंचनामा तयार केला. त्या पँटची अल्ट्राव्हायलेट किरणाखाली पाहणी केली असता, पँटच्या पाठीमागच्या खिशामध्ये अॅथ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली. त्यांनतर ती पँट पंचासमक्ष जप्त करुन त्याला सिल करण्यात आली. लाचेची रक्कम ही रु.५००/– च्या सहा नोटा होत्या. त्या नोटा मी एका पाकिटामध्ये टाकून त्या पंचासमक्ष सिल केल्या.

**साक्षीदाराची पुढील सरतपासणीसाठी व्यवस्थीत तयारी नसल्यामुळे पुढील तारखेपर्यंत सरतपासणी तहकुब....**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

दिनांक – ३०/०६/२०२६.

(आर.बी.भागवत)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र.२,
लातूर